# सोलापूर विद्यापीठ
**परीक्षा विभाग**
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३ /७४/७८/७९
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ:http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: coe@sus.ac.in

‘B’ Grade (CGPA 2.62)

# Solapur University
**Examination Section**
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79
Fax No.0217-2744770
Web Site :http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: coe@sus.ac.in


**संदर्भ : सोविसो/परीक्षा/परीक्षा प्रमाद कक्ष/२०१६-१७/१९८६-B** **दि.१४/१०/२०१६**

**परिपत्रक क्र.-३४/२०१६**

**प्रति,**

१. **मा. प्राचार्य/मा. संचालक**
मा. संचालक/अध्यक्ष
सोलापूर विद्यापीठांशी सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था

२. **मा. संचालक सर्व शैक्षणिक संकूले, सोविसो**

३. **मा. संचालक/ मा. समन्वयक**
सर्व मुख्य मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रे

**विषय : परीक्षा गैरप्रकार आढळणा-या विद्यार्थ्यांच्या केसेसचे सीलबंद गट्ठे हे मुख्य मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडे जमा करणेबाबत.**

**संदर्भ** : १.परीक्षा विभागाकडील पत्र क्र.सोविसो/परीक्षा/प्रमाद समिती/२०१५-१६/११४३ दि.१९/१०/२०१५.
२. परीक्षा विभागाकडील पत्र क्र.सोविसो/परीक्षा/प्रमाद समिती/२०१५-१६/३९२ दि.१४/०३/२०१६.

**महोदय,**

विद्यापीठा तर्फे मार्च/एप्रिल व ऑक्टो/नोव्हें या दोन सत्रामध्ये परीक्षेचे आयोजन करण्यात येते. विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३२ [८] अन्वये विद्यापीठ परीक्षामध्ये गैरप्रकाराला आळा बसावा याकरीता भरारी पथकाची नेमणूक करीत असते. सदर भरारी पथके हे कुठल्याही परीक्षा केंद्राला भेट देवून परीक्षा केंद्रावरील जे विद्यार्थी परीक्षा गैरप्रकारात आढळून येतात त्यांच्याकडून संदर्भीय पत्र क्र.१ नुसार (अ) परीक्षार्थीचे गैरप्रकाराशी संबधातले जप्त केलेले साहित्य, उत्तरपत्रिका व त्या खाली अनुक्रमे, (ब) परीक्षार्थीचे निवेदन, (क) कनिष्ठ/वरिष्ठ पर्यवेक्षकांचे अहवाल, (ड) परीक्षार्थीचे हमीपत्र (इ) परीक्षार्थीचे प्रवेश पत्राची (Hall-Ticket) एक छायांकित प्रत व त्यांचा अद्ययावत मोबाईल नंबर या प्रमाणे तयार केलेला संच Suspected Unfair Means Case असा शेरा पाकिटावर लिहून गोपनिय शिक्का उमटवून सदरच्या केसेस व योग्य ती कागदपत्र व हमीपत्र हे विद्यापीठाच्या परीक्षा विभागात संबधीत सर्व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना दोन ते तीन दिवसा आड व्यक्तीश: जमा करण्यासाठी यावे लागत असे. परंतु या कार्यपध्दतीच्या अनुषंगाने महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा या कामकाजासाठी वेळेचा अपव्यय होत होता. त्यामुळे मार्च/एप्रिल-२०१६ च्या परीक्षेपासून परीक्षा केंद्रावर प्राप्त झालेल्या कॉपी केसच्या संदर्भात जप्त केलेले कागदपत्रे व साहित्याचे सीलबंद गठ्ठे मुख्य मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर वेळोवेळी उत्तरपत्रिका जमा करताना स्वतंत्र गठ्ठयात वर नमूद केलेल्या संदर्भीय पत्र क्र.२ मधे नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे पाठवणेबाबत कळविण्यात आले होते व त्यानुसार कार्यवाही झालेली आहे.

या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा.प्राचार्य/प्राचार्या,मा.संचालक/अध्यक्ष यांना या परिपत्रकाद्वारे आदेशान्वये कळविण्यात येते की, ऑक्टो/नोव्हे २०१६ च्या परीक्षेसाठीही संदर्भीय पत्र क्र.२ प्रमाणे कार्यवाही करावयाची असून त्याबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

परीक्षा केंद्रावर प्राप्त झालेल्या कॉपी केसच्या संदर्भात जप्त केलेले कागदपत्रे व साहित्याचे सीलबंद गठ्ठा हा मुख्य मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र येथे वेळोवेळी उत्तरपत्रिका जमा करताना स्वतंत्र गठ्ठयात वर नमूद केलेल्या संदर्भीय पत्र क्र.२ मधील कार्यपध्दतीप्रमाणे पाठवायचे असून मूल्यमापन केंद्राकडे जमा करण्यात येणा-या कॉपी केसेसच्या पत्राची एक प्रत lapses@sus.ac.in या ई-मेल आयडीवर वेळोवेळी पाठवावी तसेच परीक्षा गैरप्रकार (Copy Case) प्रकरणातील प्रत्येक परीक्षार्थीची माहिती परीक्षा विभागास त्वरीत उपलब्ध व्हावी. याकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिलेल्या (http://su.digitaluniversity.ac.in) Examination >> Copy Case Student Entry या Link मध्ये कॉपी केलेल्या विद्यार्थ्यांची सर्व माहिती अचूकपणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे. वरील कार्यपध्दतीमुळे शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा वेळ वाचेल व कामकाजामध्ये सुसत्रता येईल. तसेच समन्वयक मुख्य मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र यांनी विविध परीक्षा केंद्रावरून प्राप्त झालेले गठ्ठे स्वीकारून ते एकत्रित स्वरूपात कोडींग स्लीप सोबत परीक्षा विभागातील परीक्षा प्रमाद कक्षाकडे जमा करावे. कॉपी केसचे गठ्ठे महाविद्यालयीन प्रतिनिधीद्वारे विद्यापीठात पाठवू नये.

तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करून ही बाब परीक्षेशी संबंधित काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास सत्वर आणावी व परीक्षेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

(बी. पी. पाटील)
**परीक्षा नियंत्रक**